**नि.फौ.ख.क्र.५१/२०२०**
**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३**
**निशाणी क्र. ५३**

शपथेवर कथन करतो की,

**नांव** – नितीन लक्ष्मण धनावडे
**वय** – ३७ वर्षे, **धंदा** – शेती
**राहणार** – गवडी, ता.जावली, जि.सातारा

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ चा सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती. जे.आर.इंगळे</u>**

१. दिनांक ०८.१०.२०२० रोजी पोलीसांन मला म्हाते बुद्रुक या गावी अश्विनी सपकाळ यांच्या घरी बोलावले होते. माझ्या सोबत पोलीस होते. मला घटनास्थळ अश्विनी सपकाळ हिने दाखवले. ते घर पांडुरंग सपकाळ यांचे होते. सदरचे घर हे सिमेंट विटामध्ये लोड बेरींगचे होते. त्याला जिना होता व वरखाली अशा स्वरुपाचे घर होते. त्याठिकाणी पोलीसांनी आमचे फोटो घेतले. पोलीसांनी आमच्यासमोर घटनास्थळ पंचनामा केला. सकाळी साडे दहा ते साडे अकराच्या दरम्यान पंचनामा चालला होता. दुसरे पंच माझ्यासोबत धोंडीबा पाटणे हे होते. माझी सही घटनास्थळ पंचनाम्यावर अ.क्र. १ ला आहे. पंचनाम्यात लिहलेले बरोबर लिहलेले आहे. सदर फोटोमध्ये अश्विनी सपकाळ, धोंडीबा पाटणे आणि मी व पोलीस असे दिसत आहे. सदर फोटोंना अर्टिकल अ देण्यात येते. सदर पंचनाम्यात लिहलेले सर्व बरोबर आहे त्यास **निशाणी ५४** देण्यात येत आहे.
**सरतपास पूर्ण.**

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.पी.निगडकर यांचेमार्फत उलटतपास सुरु</u>**

२. माझे शिक्षण नववी पास आहे. मी अश्विनी सपकाळच्या भावकीतील आहे. हे म्हणणे खरे आहे की, ०८.१०.२०२० मध्ये कोरोना प्रादुर्भाव चालु होता. हे

म्हणणे खरे आहे की, त्यावेळी कोरोनाचे प्रतिबंध होते. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळावर गेलो नाही, पंचनामा माझ्यासमोर केला नाही. अश्विनीच्या आईवडीलांचे व आमचे चांगले संबंध आहेत ते फक्त आमच्या भावकीतील आहेत. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी पंचनामा त्यांच्या मनाप्रमाणे करुन त्यांच्या मनाप्रमाणे मजकुर टाकला. हे म्हणणे खरे नाही की, दुस–या पंचाचे नाव धोंडीराम महादेव पाटणे हा आमच्याच गावातील रहिवासी आहे. हे म्हणणे खरे नाही की अश्विनीला मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

आर.बी.खवले,

दि.२७.०१.२०२३ **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मेढा.**

**नि.फौ.ख.क्र.५१/२०२०**
**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२**
**निशाणी क्र. ४६**

शपथेवर कथन करतो की,

**नांव** – सौ. सुलाबाई रामचंद्र धनावडे
**वय** – ५५ वर्षे, **धंदा** – शेती
**राहणार** – गवडी, ता.जावली, जि.सातारा

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ चा सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती. जे.आर.इंगळे

१. गवडी येथे मी व माझे पती रामचंद्र नारायण धनावडे असे राहतो. मला लता, अर्चना, वर्षा व अश्विनी अशा ४ मुली व १ मुलगा आहे. मुलगा नवनाथ रामचंद्र धनावडे हा मुंबईला राहतो. अश्विनेचे लग्न दि.१९.०५.२०१९ रोजी मु.पो.गवडी, ता.जावली, जि.सातारा येथे सचिन पांडूरंग सपकाळ याच्यासोबत हिंदू मराठा रिती रिवाजाप्रमाणे विवाह झाला होता. लग्नानंतर ते म्हाते बुद्रुक येथे नांदण्यासाठी गेले. सचिन सपकाळ हे मुंबईला बँकेत नोकरीला आहेत. मुलीच्या सासरी सासु पार्वती पांडूरंग सपकाळ, सासरे पांडुरंग सावळाराम सपकाळ, दीर प्रशांत पांडूरंग सपकाळ, जाऊ ईश्वर प्रशांत सपकाळ असे लोकं होते. सोळावा झाल्यानंतर तिचे पती हे तिला मुंबईला ठेवून गेले. दीर बाहेरच्या देशात असतो. लग्न झाल्यानंतर माझी मुलगी म्हाते बुद्रुक येथे २–३ महिने राहिली व त्या २ महिन्यानंतर मुंबईला राहायला गेली. मुंबईला तिचा सासरा घेवून गेला. जाऊ अगोदरच मुंबईला गेली होती. त्यानंतर दोन महिन्यांनी माझी मुलगी मुंबईला राहण्यासाठी गेली असता तिच्या सासरचे मुंबईच्या घरी राहण्यासाठी घेत नव्हते. मुंबईच्या घरी तिची जाऊ, दीर, नवरा व सासरे राहण्यास होते. मुंबईतील घरी तिला जाऊ, दीर, नवरा व सासरे त्रास देवू लागले. माझा जावई सचिन सपकाळ याचे शाळेपासून लग्नाच्याआधी बाहेर एका स्त्री बरोबर संबंध होते. त्या स्त्रीबरोबरचे फोटो व इतर गोष्टी माझ्या मुलीला फोनवर दाखवायचा व डिलीट करुन टाकायचा.

२५.०३.२०२० पर्यंत ती मुंबईला होती. त्यानंतर सचिन अश्विनीला घेऊन म्हाते बुद्रुकला आला. सचिन सपकाळने माझ्या मुलीला मारहाण करुन आमच्या गवडी गावात आणून सोडले. सचिन सपकाळ माझ्या मुलीला म्हणाला की, गाडी घेण्यासाठी तीन लाख रुपये माहेरहून आण. तसे माझ्या मुलीने मला नाताळाच्या सुट्टीत सांगितले. माझ्या मुलीचे सासु सासरे गाडीसाठी तिचा जाचहाट करायचे. ते माझ्या मुलीला खायला देत नव्हते, तिने केलेला स्वयंपाक त्यांना पसंत पडत नव्हता असा जाचहाट करायचे. सचिन सपकाळ याने रक्तबंबाळ होईपर्यंत माझ्या मुलीला मारले होते व तिचा गळा दाबला होता. सदरच्या घटना या ९ महिन्याच्या आत झालेल्या आहेत. मारहाण व शिवीगाळ केली. आम्ही मिटवायसाठी मिटींग घ्या असे सांगितले होते परंतू ते मिटवायला आले नाहीत. आरोपींनी आम्हाला नोटीसा पाठवल्या होत्या. तक्रार माझ्या मुलीने दिली आहे. पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली होती. पोलीसांनी माझा जबाब घेतला होता. त्यांनी तो मला वाचून दाखवला होता. कोर्टात माझा जबाब झालेला आहे. तो जबाब माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे. त्यावर माझा अंगठा आहे. तो मी वाचून पाहिलेला आहे. त्यावर साहेबांची सही आहे. सदरील **जबाबास निशाणी क्र.४७** देण्यात येत आहे. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकतो. आरोपींपैकी फक्त माझ्या मुलीचा सासरा हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.पी.निगडकर यांचेमार्फत उलटतपास सुरु**

२. माझी मुलगी अश्विनी ही पदव्युत्तर आहे. अश्विनी सर्वात लहान आहे. अश्विनी लहानपणापासून हुशार व हजरजबाबी आहे. हे म्हणणे खरे आहे की, अश्विनी कोणाचं काही ऐकून घेत नव्हती, सडेतोड उत्तर द्यायची. हे म्हणणे खरे आहे की, अश्विनीचे लग्न माझा भाऊ धोंडीराम पाटणे यांच्या मध्यस्थीने झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रकाश सपकाळ हे लग्नात मध्यस्थी होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या भावाची मुलगी प्रकाश सपकाळ यांच्या घरी दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझी मुलगी लता मुंबई येथे घनसोली येथे राहते. हे म्हणणे खरे आहे की, लताच्या घरी मुलगी

पाहण्याचा कार्यक्रम झाला. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी आरोपी लताच्या घरी अश्विनीला पाहण्याकरीता आले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी प्रशांत याची मुंबईला स्वतःची खोली आहे असे सांगितले होते.

प्रश्न – सचिनचे आई वडील वारकरी आहेत ?

उत्तर – ते वारकरी आहेत का ते मला माहित नाही.

हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपीच्या घरचा जमीन जुमला बघायला गेलो होतो. आम्ही आरोपीच्या कुटुंबियांची माहिती घेतली होती. आरोपी सचिन हा लग्नाच्यापूर्वीपासून बँकेत नोकरीला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याला चांगला पगार आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी प्रशांत हा जहाजावर नोकरीला होता व आतासुध्दा आहे. हे म्हणणे खरे आहे की, अश्विनीचे सासऱ्यांना गावी जमीन जुमला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी पैशापाण्याने सधन होते व आहेत. हे म्हणणे खरे आहे की, अश्विनी व सचिन यांचे लग्नानंतरचे धार्मिक विधी म्हाते बुद्रुक येथे झाले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, विवाहानंतर माझ्या मुलीला तिचा नवरा कोकणात फिरायला घेवून गेला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळेस माझी मुलगी अश्विनी ही तिच्या सासु सासऱ्यांची काळजी घेत होती. हे म्हणणे खरे आहे की, मुलगी सासरी असताना कधीमधी आम्हाला फोन करायची. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी सर्व काही व्यवस्थित होते. हे म्हणणे खरे आहे की, लग्नाच्या २ महिन्यानंतर सचिन अश्विनीला नेरुळ, मुंबई येथे घेवून गेला. हे म्हणणे खरे आहे की, तेथे दोघे खोली भाडयाने घेवून रहात होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरची खोली प्रशांत व त्याच्या बायकोच्या खोलीपासून लांब होती. हे म्हणणे खरे आहे की, अश्विनी मुंबईला जाण्यापूर्वी माहेरी दोनदा आली होती. हे म्हणणे खरे नाही की, मुलगी जेव्हा माहेरी आली होती तेव्हा सचिन तिला न्यायला माहेरी आला होता. हे म्हणणे खरे आहे की, सचिन व अश्विनी नेरुळला रहात होते, प्रशांत व त्याची बायको वेगळी रहात होते व सासु सासरे गावी रहात होते. हे म्हणणे खरे आहे की, बँक लांब असल्यामुळे सचिन सकाळी ०८:३० वाजता बाहेर पडायचा व घरी पोहोचायला त्याला संध्याकाळी ०८:३० ते ०९:०० वाजायचे. हे म्हणणे खरे आहे की, सचिनबरोबर ती एक ते दीड महिना अशी राहिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, अश्विनीला दिवसभर करमायचे नाही म्हणून तिने

सचिनला मी जॉब करु का असे विचारले. हे म्हणणे खरे आहे की, सचिनची आर्थिक परिस्थिती चांगली आहे.

प्रश्न – सचिनला अशी काही परिस्थिती नव्हती की अश्विनीने नोकरी करावी ?

उत्तर – त्यांचे काही झाले असेल म्हणून ती नोकरीला गेली.

हे म्हणणे खरे आहे की, अश्विनीला नोकरी करायला सचिनने परवानगी दिली. अश्विनी कोठे नोकरी करायची ते मला काही माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, अश्विनी सकाळी ०९:३० वाजता नोकरीवर जायची व नोकरीवरुन घरी यायला संध्याकाळी ०८:३० वाजायचे. हे म्हणणे खरे नाही की, सचिनचे व अश्विनीचे मुंबई येथे असताना काही भांडण नव्हते. अश्विनी व सचिन यांच्याकडे तिचे सासू सासरे नेरुळला मुक्कामी गेले होते का याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, अश्विनी तिची बहिण लता हिला भेटायला जात होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी अश्विनीला दाढ दुखीचा त्रास झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, अश्विनीच्या दाढ दुखीवर सचिनने उपचार केले होते. हे म्हणणे खरे नाही की, सचिनचे दुसऱ्या स्त्री बरोबर संबंध आहेत असे सचिनवर खोटे आरोप केले होते. हे म्हणणे खरे नाही की, अश्विनी सचिनची नातेवाईकांमध्ये बदनामी करत होती.हे म्हणणे खरे नाही की, सचिन गाडीसाठी तीन लाख रुपये मागत नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, कोरोनात आरोपी नं.१ माझ्या मुलीसह गावी आले होते. हे म्हणणे खरे नाही की, कोरोनामध्ये सचिन व अश्विनी मुंबईहून आल्यानंतर मला भेटायला गावी आले होते. हे म्हणणे खरे आहे की, गावी आल्यानंतर अश्विनी मला फोन करायची. हे म्हणणे खरे नाही की, अश्विनी सासु सासरे व पतीबरोबर वाद घालत होती. हे म्हणणे खरे नाही की, अश्विनी मला माहेर सोडा नाहीतर मी जीवाचे बरेवाईट करेन अशी धमकी देत होती. हे म्हणणे खरे आहे की, अश्विनीच्या सांगण्यावरुन दि.१२.०४.२०२० रोजी अश्विनी आमच्याकडे आली. अश्विनीला त्रास होत होता त्याबाबत आम्ही पोलीसांकडे तक्रार केली नव्हती. सचिनने नोटीस पाठवल्यानंतर आम्ही मुलीला नांदायला पाठविले नाही. गवडी ते मेढा अर्धा तास अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, कोरोना काळात दवाखाना सुरु होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या जबाबात दि.१२.०४.२०२० रोजीचा जो मजकूर लिहिलेला आहे तो खोटा लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, गाडी खरेदीसाठी तीन लाखांची मागणी

केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पैशांची मागणी पूर्ण केली नाही म्हणून अश्विनीला उपाशी ठेवले, मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सचिनचे एका स्त्री बरोबर अनैतिक संबंध होते हा मजकूर मी पोलीसांना सांगितला नाही. तसा मजकूर माझ्या जबाबात का नाही ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जबाबात सचिनने अश्विनीचा गळा दाबला हा मजकूर नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलीला सासरी एवढा त्रास नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

आर.बी.खवले,

दि.१३.१०.२०२२ **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मेढा.**

**नि.फौ.ख.क्र.५१/२०२०**
**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१**
**निशाणी क्र.३३**

शपथेवर कथन करतो की,

**नांव** – सौ. अश्विनी सचिन सपकाळ
**वय** – ३० वर्षे, **धंदा** – गृहिणी
**राहणार** – मु.पो. गवडी, ता.जावली, जि.सातारा

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती. जे.आर.इंगळे**

१. सध्या मी आई वडीलांसोबत गाव मौजे गवडी येथे रहात आहे. दि.१९.०५.२०१९ रोजी मु.पो.गवडी, ता.जावली, जि.सातारा येथे सचिन पांडूरंग सपकाळ यांच्यासोबत हिंदू मराठा रिती रिवाजाप्रमाणे विवाह झाला होता. सदरचे लग्नाचा खर्च हा माझ्या आईवडीलांनी केला होता. सदरचा खर्च हा पाच लाख रुपये झाला होता. लग्नानंतर मी म्हाते बुद्रुक येथे नांदण्यासाठी गेले. माझ्या सासरी सासु पार्वती पांडूरंग सपकाळ, सासरे पांडुरंग सावळाराम सपकाळ, दीर प्रशांत पांडूरंग सपकाळ, जाऊ ईश्वर प्रशांत सपकाळ असे लोकं होते. आम्ही सर्व म्हाते बुद्रुक येथे एकत्र कुटुंबात रहात होतो. माझे पती एच.डी.एफ.सी.बँक, परेल, मुंबई येथे कामास आहेत. लग्नानंतर म्हाते बुद्रुक येथे २ महिने राहिले व त्या २ महिन्यानंतर मुंबईला राहायला गेले. मी म्हाते बुद्रुक येथे रहात असताना सासु सासरे मला गाडी घेण्यासाठी माहेरहून तीन लाख रुपये घेवून ये असे म्हणून जाचहाट करत होते. सदरचे तीन लाख रुपये चार चाकी गाडी घेण्यासाठी आण म्हणून सांगत होते. त्यानंतर दोन महिन्यांनी मी मुंबईला राहण्यासाठी गेले असता माझ्या सासरचे मुंबईच्या घरी राहण्यासाठी घेत नव्हते. मुंबईच्या घरी जाऊ, दीर, नवरा व सासरे राहण्यास होते. मुंबईतील घरी मला जाऊ, दीर, नवरा व सासरे त्रास देवू लागले. तसेच, माझी नणंद त्याठिकाणीच बाजूला राहायला होती तीदेखील त्रास देवू लागली.

२. त्यानंतर दि.२५.०३.२०२० रोजी कोरोना असल्यामुळे मी व माझे पती गावी म्हाते बुद्रुक येथे आलो. माझा नवरा मला गावी आल्यावरदेखील सतत शिवीगाळ करायचा. सततची शिवीगाळ हा तो गाडी घेण्यासाठी तीन लाख रुपये आण म्हणून करत होता. तेव्ही मी त्यांना सांगायचे की माझ्या आई वडीलांची परिस्थिती नाही. त्यानंतर सचिनने मला जास्तच मारहाण सुरु केली व माझा गळा दाबला. तसेच, मला गालावर मारले व हात पिरगळला. त्यामुळे, माझ्या हातातील बांगडया फुटल्या व माझ्या हातातून रक्त आले. सदर लोकं हे मला पैसे नाही घेवून आले तर तुला घरात जागा नाही असे म्हणायचे. सचिन व प्रशांत यांनी मला ''भेंचोद, मादरचोद'' अशी शिवीगाळ केली.

३. त्यानंतर दि.१२.०४.२०२० रोजी माझी इच्छा नसताना सचिन सपकाळ याने मला माझ्या आई वडीलांच्या घरी नेऊन सोडले. त्यानंतर मला वाटले की, माझ्या सासरचे लोकं मिटवायला येतील. माझे आई वडील माझ्या सासरच्या लोकांना फोन करायचे पण ते टाळाटाळ करायचे. माझे आई, वडील, चुलते माझ्या सासरच्या लोकांकडे गेले. त्यानंतर मी घटनेबाबत मेढा पोलीस स्टेशन येथे दि.०७.१०.२०२० रोजी तक्रार दिली. आता मला दाखवण्यात आलेली तक्रार ही तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदरील **तक्रारीस निशाणी क्र.३४** देण्यात येत आहे.

४. तक्रार दिल्यानंतर पोलीस म्हाते बुद्रुक येथे गेले होते. पोलीसांना घटनास्थळ मी, माझे मामा व चुलत भाऊ यांनी दाखवले. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. पोलीसांनी घटनास्थळावर फोटो काढले. त्यानंतर पोलीसांनी माझा पुरवणी जबाब घेतला होता. पुरवणी जबाब घेतला होता त्यावेळी मी पोलीसांना एकुण तीन लग्नाचे फोटो, लग्नाची पत्रिका दिले होते. मारहाणीबाबतचे दोन फोटो माझ्याकडे होते ते मी अमृता फोटो स्टुडिओ, मेढा येथून प्रिंट काढले व त्यानंतर मी पोलीसांना दिले. आता मला माझा पुरवणी जबाब दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.३५** देण्यात येत आहे.

लग्नपत्रिका मान्य असल्यामुळे **<u>लग्नपत्रिकेस निशाणी क्र.३६</u>** देण्यात येत आहे. **<u>लग्नाचे फोटो</u>** मान्य असल्यामुळे त्यास **<u>निशाणी क्र.३७/१ ते ३७/३</u>** देण्यात येत आहे.

५.        त्यानंतर मी न्यायालयात येवून जबाब दिला होता. न्यायालयात माझा जबाब माझ्या सांगण्याप्रमाणे घेतला होता. सदर जबाबावरील सही ही माझी असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदरील **<u>जबाबास निशाणी क्र.३८</u>** देण्यात येत आहे. आजरोजी न्यायालयात सासु, सासरे, पती हे तिघे हजर आहेत.

**सरतपास पूर्ण.**

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एस.पी.निगडकर यांचेमार्फत उलटतपास सुरु</u>**

६.        माझे शिक्षण एम.ए.फस्ट इयर झालेले आहे. आम्ही चार बहिणी व एक भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या लग्नात धोंडीराम लक्ष्मण पाटणे हे मध्यस्थी होते. धोंडीराम पाटणे हे माझे मामा आहेत. माझ्या मामाची मुलगी प्रकाश सपकाळ यांना दिली. लग्न हे माझे मामा व सचिनचे मामा यांच्या मध्यस्थीने ठरलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी बहिण लता वेंधे ही घनसोली येथे लग्न ठरले त्यावेळी रहात होती. हे म्हणणे खरे आहे की, डिसेंबर २०१८ मध्ये माझ्या बहिणीच्या घरीच मला पाहण्याचा कार्यक्रम झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी सचिन, संतोष सपकाळ व इतर नातेवाईक माझ्या बहिणीच्या घरी आले होते. त्यानंतर आम्ही सचिनच्या गावी गेलो.
प्रश्न – तुमच्या लग्नाची बोलणी चालू होती त्यावेळेस आरोपी क्र.१ हा त्याचा भाऊ प्रशांत याच्या घरी राहण्यास होता ?
उत्तर – तो लग्नाच्या अगोदर कोठे राहण्यास होता हे मला माहित नाही.
हे म्हणणे खरे आहे की, माझ्या नवऱ्याच्या नावावर गुलवे, मुंबई येथे खोली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ते ४ हे वारकरी संप्रदायाचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सासरे वारकरी संप्रदायातील आहेत. ते नियमितपणे वारीला, पंढपूरला जातात. हे म्हणणे खरे नाही की, माझे आई वडील जेव्हा आरोपीच्या घरी गेले तेव्हा आरोपीचे घर शेती आम्हाला माहित होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे गावचे घर

हे चार मोठया खोल्या व पडवी अशी बांधीव मिळकत आहे. सासऱ्यांना गावी किती शेती आहे ते मला माहित नाही पणी गावी शेती आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ चे शिक्षण बी.कॉम. व आरोपी क्र.४ चे शिक्षण बी.एस.सी. झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.४ चा हॉटेल मॅनेजमेंटचा कोर्स झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.४ कोर्सच्या अनुषंगाने जहाजावर असतो. साक्षीदार स्वतःहून पुढे सांगतो की, तो गावी येवून जावून असतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या लग्नात देणे घेणे झाले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, विवाहानंतर मला थोडे दिवस गावी राहावे लागेल असे सांगण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, धार्मिक विधी झाल्यानंतर मी व आरोपी फिरण्यासाठी कोकणात गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, लग्नानंतर १५ दिवसांनी माझे पती मुंबईला कामानिमित्त गेले. हे म्हणणे खरे आहे की, पती मुंबईला गेल्यानंतर दरम्यानचे कालावधीत मी सासु सासरे यांच्याकडे राहण्यास होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी सासु सासरे व इतर प्रापंचिक जबाबदारी मी पार पाडत होते. हे म्हणणे खरे नाही की, सचिनचे व माझे त्यावेळी दैनंदिन बोलणे होत होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या कालावधीत माझे माझ्या आईसोबत बोलणे होत होते.

७. हे म्हणणे खरे आहे की, विवाहानंतर थोडया दिवसांत नेरुळ, मुंबई येथे सचिनने एक खोली भाडयाने घेतली. हे म्हणणे खरे आहे की, जूलै २०१९ मध्ये मी व सचिन नेरुळ येथील खोलीत भाडयाने रहात होतो. मुंबईला जाण्यापूर्वी मी दोनवेळा माहेरी गेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मुंबईला जाण्याच्या अगोदर मी जेव्हा माहेरी गेले तेव्हा आरोपी क्र.१ हा मला घेण्यासाठी माहेरी आला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपी क्र.१ हा माझ्या आईवडीलांकडे मुक्कामी होता. ऑगस्ट २०१९ मुंबई येथे मला दाढदुखीचा त्रास झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपी क्र.१ सचिन याने श्री डेंटल क्लिनीक येथे माझ्यावर उपचार केले. हे म्हणणे खरे आहे की, विवाहानंतर तीन महिन्यांनी आरोपी क्र.४ हे शिपवर गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी जेव्हा फिर्याद दाखल केली तेव्हादेखील आरोपी क्र.४ हे शिपवर होते. हे म्हणणे खरे आहे की, जेव्हा मी नेरुळला रहात होते तेव्हा आरोपी क्र.१ हा सकाळी ०८:३० वाजता बाहेर पडायचा. हे म्हणणे खरे आहे की, त्यांना बँकेत पोहोचण्यासाठी एक ते दीड

तासाचा वेळ लागायचा. हे म्हणणे खरे आहे की, कामावरुन येण्यास त्यांना संध्याकाळी ०८:३० ते ०९:०० वाजायचे. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या कालावधीत एक ते दीड महिना घरी एकटीच रहात होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या कालावधीत मला एकटीला करमत नसल्यामुळे मी आरोपी क्र.१ कडे नोकरी करण्याबाबत इच्छा व्यक्त केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने त्यावेळेस मला नोकरीची आवश्यकता नाही असे सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी कोपरखैरणे येथील आधार सेंटरवर जॉब करत होते. हे म्हणणे खरे आहे की, सकाळी ०९:३० ते रात्री ०८:०० पर्यंत माझी नोकरी होती. मी आरोपीबरोबर जेव्हा नेरुळ येथे रहात होते तेव्हा माझ्या बहिणीकडे दोनवेळा गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी व आरोपी क्र.१ एकत्र रहात होतो तेव्हा किरकोळ कारणावरुन आरोपी क्र.१ सोबत वाद घालत होते. हे म्हणणे खरे आहे की, नेरुळला सासु सासरे आमच्याकडे एक दिवस मुक्कामी राहिले होते. हे म्हणणे खरे नाही की, सासु सासरे यांचे आमच्याकडे वरचेवर येणे जाणे होत नव्हते.

८. हे म्हणणे खरे नाही की, दि.१०.१०.२०१९ रोजी मी आरोपी क्र.१ याच्याशी वाद घालून कोपरखैरणे येथील बहिणीकडे गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस मी आरोपीला न सांगता तीन दिवस बहिणीकडे राहिले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस आरोपी क्र.१ याचे परस्त्रीशी अनैतिक संबंध आहेत या खोटया कारणावरुन मी आरोपीशी वाद घालत होते. हे म्हणणे खरे नाही की, तशा खोटया तक्रारी करुन मी आरोपीची व त्याच्या कुटुंबाची बदनामी करत होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी लग्नानंतरचे सर्व सण माझ्या माहेरी केले. साक्षीदार सांगतो की, फक्त श्रावणपाठीला गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, लॉकडाऊन झाल्यानंतर मी, माझे पती, आरोपी क्र.४, त्याची पत्नी, त्याची मुले गावी म्हाते बुद्रुक येथे आलो. आरोपी क्र.१ याने बोलेरो गाडी गावावरुन मागवली होती का ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मुंबईहून गावी आल्यानंतर मी आई वडीलांना भेटायचे असे १–२ दिवसांतच आरोपीला सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी आरोपी मला माझ्या आई वडीलांकडे २–३ दिवसांत घेवून गेले. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी कोरोनाचा प्रसार वाढल्यामुळे मला गावातील लोकांनी त्यावेळी विरोध केला त्यामुळे मी परत सासरी आले. हे म्हणणे खरे आहे की, मार्च २०२० ते सप्टेंबर २०२० या काळात शासनाचे

कडक निर्बंध लागू होते. हे म्हणणे खरे आहे की, कोरोना काळात मी, सासु, सासरे, जाऊ, दीर व आरोपी क्र.१ हे सर्व म्हाते बुद्रुक येथे रहात होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्याकाळात कौटुंबिक जबाबदारी वाढल्यामुळे मी आरोपीला माहेरी सोडा असे म्हणत होते. हे म्हणणे खरे नाही की, मला माहेरी सोडले नाही तर मी जीवाचे बरे वाईट करेन अशी आरोपींना धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सांगण्यावरुन दि.१२.०४.२०२० रोजी मला माहेरी सोडले. एप्रिल २०२० मध्ये मी छळाबाबत पोलीसांकडे तक्रार केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, विवाहसंबंध पुनर्प्रस्थापित करण्याकामी आरोपीने माझ्याकडे संपर्क केला.

९. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ याने ॲड. गणेश शेलार यांच्यामार्फत नांदायला येण्याकामी नोटीस पाठवली होतीव त्या नोटीसला ॲड. सुरेंद्र ओंबळे यांच्यामार्फत मी नोटीस उत्तर दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी विनाकारण आरोपीची बदनामी करत होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ याला माझ्यासोबत विवाहसंबंध पुनर्प्रस्थापित करायचे असतानादेखील मी नकार द्यायचे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना कोठेतरी चाप बसावा म्हणून मी खोटी फिर्याद दिली आहे.

प्रश्न – तुम्हाला शारिरीक व मानसिक त्रास होत होता याबाबत तुम्ही पोलीसांकडे तक्रार केली नाही ?

उत्तर – दरम्यानच्या दोन महिन्यांच्या काळात ते सुधारतील असे वाटत होते म्हणून मी तक्रार दिली नाही.

हे म्हणणे खरे नाही की, दि.२५.०३.२०२० ते दि.१२.०४.२०२० दरम्यान आरोपींनी मला शारिरीक व मानसिक त्रास दिला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझ्याकडे पैशाची मागणी केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला सर्व मजकूर खोटा सांगितलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझा एकदाच जबाब घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी मारहाणीचे दाखल केलेले फोटो हे खोटे फोटो दाखल केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींवर दबाव आणण्यासाठी व त्यांच्याकडून पैसे काढण्यासाठी मी आरोपींविरोधात कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझ्याकडे कोठल्याही प्रकारची मागणी केली नाही तसेच, कोणत्याही

प्रकारचा त्रास दिलेला नसताना मी त्यांच्याविरुध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-

आर.बी.खवले,

दि.२०.०७.२०२२ **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मेढा.**